## मसुदा

**मे. कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊसगाळप क्षमता ५,०००.० टन प्रतिदिन पासून १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत विस्तारिकरण, सहवीज प्रकल्प १९.५ मे.वॅटपासून ३०.० मे.वॅटपर्यत विस्तारिकरण आणि मळी/ऊसाचा रस/पाक यावर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक **मे. कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र राज्य** यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊसगाळप क्षमता ५,०००.० टन प्रतिदिन पासून १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत विस्तारिकरण, सहवीज प्रकल्प १९.५ मे.वॅटपासून ३०.० मे.वॅटपर्यत विस्तारिकरण आणि मळी/ऊसाचा रस/पाक यावर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प प्रवर्तकांचे शेतकरी सांस्कृतिक भवन, प्रकल्प स्थान,गाव-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचे आगमन झालेले असून बरेचजण सभामंडपाबाहेर उभे आहेत, त्यांनी सभामंडपात येऊन बसावे.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी तसेच श्री निखिल घरत, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग बी-१ अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

त्यापुढे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र राज्य यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊसगाळप क्षमता ५,०००.० टन प्रतिदिन पासून १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत विस्तारिकरण, सहवीज प्रकल्प १९.५ मे.वॅटपासून ३०.० मे.वॅटपर्यत विस्तारिकरण आणि मळी/ऊसाचा रस/पाक यावर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत विस्तारिकरण करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन ऑनलाईन अर्ज दिनांक १४-०३-२०२४ रोजी सादर केला होता. त्यास अनुसरुन भारत सरकारने दिनांक २२-०३-२०२४ रोजी ऑनलाईन मंजूरी प्रदान केली व त्यामधील अटी व शर्तीनुसार पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक २३०४.२०२५. रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे देण्यात आला होता. त्यास अनुसरुन सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक २५०४२४-FTS०१२१- दिनांक २४०४..२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली होती. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती. त्यास अनुसरुन मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प प्रवर्तकांचे मे कोल्हापूर यांचे.जि ,करवीर.ता ,कुडित्रे .पो.मु .कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लि . शेतकरी सांस्कृतिक भवन, कारखाना साईट ,गाव-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली होती. तदनंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-४९/ २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०६३०-एफटीएस-०२७५, दिनांक ३०-०६-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,कोल्हापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा). | **-अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी - कोल्हापूर,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर. | **-सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर. | **-आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०९-०६-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज

जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर,
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, कोल्हापूर,
४. मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
५. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.
६. उप विभागीय अधिकारी, करवीर आणि पन्हाळा, जिल्हा – कोल्हापूर,
७. प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कोल्हापूर – ४१६ ००३.
८. तहसीलदार, तहसील कार्यालय,करवीर, तालुका-करवीर, जिल्हा- कोल्हापूर.
९. तहसीलदार, तहसील कार्यालय,पन्हाळा, तालुका-पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर.
१०. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, करवीर, तालुका करवीर, जिल्हा- कोल्हापूर.
११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पन्हाळा, तालुका-पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर.
१२. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालये- कुडित्रे, वाकरे, कोपार्डे, सांगरूळ, अडूर, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर,
१३. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकरी, ग्रामपंचायत कार्यालये- यवलूज, सातार्डे, तालुका-पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर,

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर यांना १४ सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने प्राप्त झालेले आहेत तर ०३ (तीन) सूचना/आक्षेप ईमेलव्दारे प्राप्त झालेले आहेत असे सांगितले. तसेच आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात येणार असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

त्यापुढे आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन

अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

त्यामध्ये प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक **मे. कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर (४१६ २०४), महाराष्ट्र राज्य** यांनी त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊसगाळप क्षमता ५,०००.० टन प्रतिदिन पासून १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत विस्तारिकरण, सहवीज प्रकल्प १९.५ मे.वॅटपासून ३०.० मे.वॅटपर्यत विस्तारिकरण आणि मळी/ऊसाचा रस/पाक यावर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत विस्तारिकरण योजिलेले आहे.

सदरहू प्रकल्प हा पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी-१ मध्ये [साखर उत्पादन - ५ (जे), आसवणी – ५ (जी) आणि सहवीज उत्पादन – १ (डी) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. त्यापुढे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी कार्यरत प्रकल्प व प्रस्तावित प्रकल्प यातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पात साखर कारखाना व सहवीज प्रकल्प विस्तारीकरणासाठी गुंतवणूक ही रुपये २००.२५ कोटी तर आसवणी प्रकल्प विस्तारिकरणासाठी गुंतवणूक ही रुपय १२०.२५ कोटी एवढी असेल असे सांगितले. तसेच पर्यावरण व्यवस्थापनासाठी साखर प्रकल्पात रुपये ९.८४ कोटी, तर आसवणी प्रकल्पात रुपये ५६.५७ कोटी एवढी असेल. साखर कारखाना वर्षात १२० दिवस (जास्तीतजास्त १५० दिवस) तर सहवीज प्रकल्प संपुर्ण हंगाम + ५० दिवस, तर आसवणी प्रकल्प वर्षभर कार्यरत राहणार आहे.

त्यापुढे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा झेडएलडी – शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असून शेतक-यांच्या हिताचा प्रकल्प आहे व प्रस्तावित प्रकल्पात १०० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि प्राप्त होईल. तसेच सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात

वाढ होईल. त्याचप्रमाणे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% म्हणजे २२.३४ हेक्टर क्षेत्रात हरितपट्टा विकसित करण्यात येईल. त्यासाठी प्राधान्याने स्थानिक झाडे लावण्यात येतील. सध्या विद्यमान हरितपट्ट्यामध्ये ६,८८९ झाडे लावलेली आहेत. प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात ३७,८०० झाडे लावण्यात येतील.

सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यास मदत मिळेल. सदरहू प्रकल्पात तयार होणारे इथेनॉल हे पेट्रोलमध्ये मिश्रित केल्याने पेट्रोसची बचत होऊन परकीय चलन वाचण्यास मदत होईल, तसेच वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. तसेच नियोजित प्रकल्पामुळे वर्षाजल पुनर्भरण केल्याने ताज्या पाण्याचे स्त्रोत जतन करण्यास मदत होईल याबाबतची माहिती दिली. तसेच सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे. त्याच बरोबर सदरील सादरीकरणामध्ये प्रभावी क्षेत्रामध्ये हवेचे, पाण्याचे व मातीचे नमुने घेण्यात आलेले होते, त्यांचे पृथ:करण करुन सदयस्थितीबाबतची माहिती सादर करण्यात आली. तसेच प्रस्तावित विस्तारीकरण झाल्यानंतर हवा, पाणी व जमिनीवर होणा-या परिणामाबाबतची माहिती देवून प्रदूषण कमी करण्याच्या उपाययोजने बाबतची माहिती सादर करण्यात आली, त्याचबरोबर प्रस्तावित विस्तारीकरणामुळे होणारे फायदे व प्रदूषणासंदर्भात केलेल्या उपाययोजना याबाबतच्या संपूर्ण माहितीचे सादरीकरण केले. (प्रकल्पप्रवर्तका मार्फत करण्यात आलेल्या सादरीकरणाची प्रत सोबत जोडत आहे.)

सादरीकरण संपूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ च्या निर्देशांनुसार प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल हा सूचित शासकीय कार्यालयात स्थानिकांच्या व बाधित गावातील ग्रामस्थांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना प्रत्यक्ष/टपालव्दारे/सूचित शासकीय कार्यालयांकडून तसेच ईमेलव्दारे सूचना,टीकाटिप्पणी तसेच आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

त्यावर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की १४ सूचना/आक्षेप या कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने तर ०३ (तीन) सूचना/आक्षेप ईमेलव्दारे प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, कोपार्डे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर यांच्याकडून १३ (तेरा)

ग्रामस्थांच्या सूचना/आक्षेप, टीकाटिप्पणी प्राप्त झालेले असून त्यांची नांवे, १) श्री भारत भिकाजी पाटील, २) श्रीमती मालूबाई विलास पाटील, ३) श्री सदाशिव पाटील, ४) श्री कुमार शामराव पाटील, ५) श्री ज्योतीराम गणपती पाटील, ६) श्री दत्तात्रय गणपती पाटील, ७) श्री सरदार रघुनाथ पाटील ८) श्री विलास रघुनाथ पाटील, ९) श्री महादेव शंकर पाटील, १०) श्री मारूती भिकाजी पाटील, ११) श्री अशोक गोगाजी मळेकर १२) श्री बाजीराव मारुती पाटील, १३) श्री आसाराम नारायण पाटील या तेरा ग्रामस्थांच्या टीकाटिप्पणी एकत्रित करुन उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ कोल्हापूर यांना सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यातील मुद्दे हे एकसारखेच आहेत. त्यात मुख्यत्वे मळी साठवणुकीमुळे व प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडल्यामुळे होणारे प्रदूषण व प्रदूषीत पाणी ज्या खडडयामध्ये साठविण्यात येते, तेथून सांडपाणी त्यांच्या शेतात जाते. तसेच गेले ४-५ वर्षे मळीमुळे झालेले खड्डे, तसेच प्रक्रिया न केलेले सांडपाणी प्रकल्पाबाहेर परिसरात सोडल्यामुळे त्यांच्या शेतात ते सांडपाणी जाते, त्यामुळे शेतीत काम करणे अवघड जाते. तसेच मळीमिश्रित सांडपाणी सोडल्याने शेतातील/परिसरातील विहिरी या बाधित झालेल्या आहेत. त्यामुळे दरवर्षी नोव्हेबर,डिसेंबर व जानेवारी महिन्यात हा त्रास मोठ्याप्रमाणात त्यांना सहन करावा लागतो. तरी यावर प्रकल्प प्रवर्तकांनी उपाययोजना केल्याच पाहिजेत, अन्यथा प्रकल्प विस्तारिकरणास मान्यता देण्यात येऊ नये अशी त्यांनी सूचना नोंदविलेली आहे.

याशिवाय १४वी टीकाटिकण्णी प्राध्यापक बाजीराव बापू पाटील, राहणार कुडित्रे तालुका करवीर जिल्हात्यांनी आक्षेप नोंदविलेला आहे की .कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झालेली आहे- प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रकल्पातील चिमणीस जरी ईएसपी कार्यान्वित केलेला आहे, तरी तो व्यवस्थित चालविला जात नसल्याने परिसरातील लोकांना धुराचा त्रास होतो. त्याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची त्यांनी मागणी केलेली आहे. तसेच हरितपट्टा विकसित करताना योग्यप्रकारे नियोजन करुन तो विकसित करण्यात यावा. जेणेकरुन त्याचा फायदा स्थानिक शेतक-यांना व कारखान्यालासुध्दा होईल. तसेच कार्यरत प्रकल्पात जे प्रदूषण होते,त्यामुळे ज्या तक्रारी उपस्थित होतात, त्याबाबत त्यांच्यावर पूर्ण उपाययोजना करुन प्रदूषण न होण्याबाबत प्रकल्प धारकांनी खबरदारी घ्यावी असे मत मांडलेले असून तोपर्यत प्रकल्प विस्तारिकरणास परवानगी देण्यात येऊ नये अशी सूचना सदरील निवेदनात त्यांनी केलेली आहे.

या व्यतिरिक्त ०३ (तीन) सूचना,आक्षेप,टीकाटिप्पणी ईमेलव्दारे म.प्र.नि.मंडळ कार्यालय,कोल्हापूर यांना प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये श्री. आनंदा दिनकर पाटील, राहणार-कोपार्डे गाव, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर यांच्याकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यांनी प्रतिपादन केलेले आहे की कारखान्याकडून जी मळी साठवली जाते, तसेच कारखान्यातून वातावरणात सोडण्यात येणा-या धुरामुळे जे

वर्षानुवर्षे प्रदूषण करण्यात येत आहे. तर प्रकल्प विस्तारीकरण करुन प्रकल्प प्रवर्तक असेच प्रदूषण करत राहणार आहेत काय अशी विचारणा केलेली आहे. कारखान्याकडून सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची पूर्तता करुन प्रकल्प प्रवर्तकांकडून प्रदूषण न करण्याची लेखी हमी घेऊनच प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास मान्यता घेण्याची मागणी केलेली आहे. याव्यतिरिक्त उर्वरित दोन ईमेल्स हे श्री सुनंदा रेड्डी, राज्य-तेलंगणा व श्री पल्ली नवीनकुमार यांच्याकडून प्राप्त झालेले आहेत. त्यात त्यांनी मत मांडले की भारत सरकारच्या अधिसूचनेनुसार पारित केलेल्या सर्व अटी व शर्ती यांची प्रकल्प प्रवर्तकांकडून पूर्तता करुनच प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास मान्यता देण्यात यावी. सोबत प्राप्त झालेल्या १४ सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने प्राप्त झालेले व ०३ (तीन) सूचना/आक्षेप ईमेलव्दारे जोडत आहे.

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, विचार, टिकाटिप्पणी किंवा आक्षेप उपस्थित करण्याचे आणि एकसारखे मुद्दे उपस्थित न करण्याचे आवाहन केले. त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) मराठीत अतिशय योग्यप्रकारे सादरीकरण केलेले आहे जो जनसुनावणी प्रक्रियेतील ही पहिला टप्पा आहे. तरी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उपस्थित केलेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. त्यापुढे त्यांनी भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे असे आवाहन केले. तसेच सूचना/आक्षेप नोंदविताना अगोदर जर तो उपस्थित केला असल्यास तो परत मांडू नये कारण त्यामुळे इतरांनाही भूमिका मांडण्यास संधि देण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) प्राध्यापक बाजीराव पाटील, राहणार-कुडिले, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

२३ जुलै, २०१४ साली याच सभागृहात सहवीज प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी झालेली होती आणि आज ११ जुलैला २०२५ रोजी प्रकल्प विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी होत आहे. जुलै महिना हा अतिवृष्टीचा असतो व सदर प्रकल्प हा

कोल्हापूरच्या पश्चिम भागात आहे. तसेच या महिन्यात येथे ब-याच मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे अशा जाहिर जनसुनावण्या या कालावधीत टाळल्या जातात. आजच्या या कार्यक्रमाला पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी म्हणतात, मात्र ही जनसुनावणी ही बंधिस्त सभागृहात घेण्यात आलेली आहे यावर माझा आक्षेप आहे, याची नोंद घेण्यात यावी. तसेच आज जनसुनावणीत असे सांगण्यात आले की प्रकल्पात ७२.० मीटर्सची चिमणी (स्टॅक) ही बसविण्यात आलेली आहे. परंतु २०१४ ला जनसुनावणी प्रकल्प अहवालात ७०.० मीटर्सची चिमणी (स्टॅक) चा उल्लेख होता. तरी चिमणी वाढली का वाढविली ही माझी शंका उपस्थित केली.

त्यापुढे दुसरा प्रश्न प्रकल्पातील ईएसपी (Electro Static Precipitator) प्रणाली संदर्भात आहे. ईएसपी प्रणाली ही २०१४ ला कार्यान्वित करण्यात आली आहे परंतु २०१५ पासून आतापर्यत म्हणजे शेवटच्या हंगामापर्यत – मार्च २०२५ पर्यंत परिसरात चिमणीतून राख पडत आहे. त्यामुळे २०१४ च्या जनसुनावणी नंतर दरवर्षी परिसरात राख पडत असून आम्ही दरवर्षी तक्रारी शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण मंत्र्यांकडे लेखी तक्रारी केलेल्या आहेत. परंतु कारखान्यानेसुध्दा फक्त लेखी उत्तरे वेळोवेळी दिलेली आहेत. ज्यामध्ये २०१८ साली कारखान्याने उत्तर दिले की ईएसपी प्रणाली नादुरुस्त झाल्याने राखेचे प्रमाण वाढलेले आहे. तर माझा याबाबत प्रश्न आहे की ईएसपी प्रणाली स्थापित केल्यानंतर किती काळापर्यत कार्यक्षम राहते, त्याचे किती आयुष्य असते? तसेच त्यावेळी २०१४ साली वेट स्क्रबर (wet scrubber) वापरणार असल्याचा उल्लेख आहे. परंतु आता सादरीकरणात वेट स्क्रबर (wet scrubber) बाबत उल्लेख नाही. तरी याबाबत तांत्रिक माहिती व चिमणीची उंची ७० मीटर आहे वा ७२ मीटर आहे याबाबत खुलासा करण्यात यावा.

यावर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारीकरण प्रकल्पात कार्यरत चिमणी (स्टॅक) वापरणारच आहोत, त्याचबरोबर १००.० टीपीएच म्हणजे १००.० टन प्रति तास क्षमतेचा नविन बॉयलर घेण्यात येणार आहे व त्यासाठी नविन ईएसपी कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्प कार्यान्वित ईएसपीवरच अवलंबून राहणार नाही. त्यापुढे प्रकल्पात २००.० टन प्रति तास आपण वाफेची निर्मिती करणार आहोत व स्टॅक इमिशन म्हणजे धुराड्यातून जो धूर बाहेर पडेल, तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसारच (prescribed standards) उत्सर्जित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Online Continuous Monitoring System बंधनकारक आहे व त्याचा एक संपर्क (connection) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व मुख्यालय महाराष्ट्र प्रदूषण

नियंत्रण मंडळ येथे असतो. त्यापुढे त्यांनी पारित केलेल्या मानकांपेक्षा (prescribed standards) जास्त उत्सर्जन झाल्यास त्वरित प्रकल्प प्रवर्तक,पर्यावरण सल्लागार यांना त्वरित त्याबाबत इशारा संदेश (Alert Message) पाठविण्यात येतो ज्यामध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप होत नाही. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व मुख्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून प्रकल्प प्रवर्तक यांना त्वरित इशारा संदेश (Alert Message) पाठविण्यात येतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी ईएसपीचे किती आयुष्य असणार आहे याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईएसपी हा वेळोवेळी सुधारित(modified) करण्यात येतो व त्याचे आयुष्य खूपच मोठे असते. जेथे बगॅस वापरण्यात येतो त्याठिकाणी सदरील ईएसपीला चार फिल्ड् असतात ज्यामध्ये एक फिल्ड राखीव ठेवण्यात येते. तरी विस्तारिकरण प्रकल्पासाठी नियोजन करत असताना एक फिल्ड खराब झाले तर राखीव फिल्ड काम करेल असे नियोजन करण्यात आले आहे. त्यापुढे आपणास जी पारित मानके (prescribed standards) पाळावयाची आहेत, यासाठी कारखाना वचनबध्त असुन ती सर्व मानके पाळण्यात येतील असे सांगितले.

त्यावेळी श्री बाजीराव पाटील यांनी कार्यरत प्रकल्पाविषयी मुद्दा उपस्थित केला असता अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पाविषयी भाष्य करण्याचा अधिकार या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस नसल्यामुळे भविष्यात जर प्रकल्प प्रवर्तक पारित मानके पाळत नसतील, तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ त्यांच्यावर पर्यावरण कायद्यांनुसार पुढील योग्य ती कारवाई करेल असे सांगितले. त्यापुढे श्री बाजीराव पाटील यांनी मुद्दा मांडला की ईएसपी फक्त कागदावर न लिहिता त्याची कार्यक्षमतेने अंमलबजावणी व्हावी. अध्यक्ष यांनी मुद्द्यांची नोंद इतिवृतात घेतल्याचे सांगितले.

**२) श्री संजय जोतीराम पाटील, राहणार-वाकरे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर:-**

मी ब-याच वेळा प्रदूषणाच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर कार्यालयात नोंदविलेल्या आहेत. आताच उपस्थितांनी सांगितले की पूर्वीही जनसुनावणी घेतली, तरीही प्रदूषण होत आहे. येथे विस्तारिकरणास कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. मी प्रकल्पापासून फक्त २.० कि.मी. अंतरावर राहतो व कुडित्रे, कोपारडे, वाकरे आणि सांगरुळ या गावांनाच प्रदूषणाचा त्रास होत आहे, तसेच विस्तारीकरणामुळे भविष्यात प्रदूषणाचा धोका जास्त प्रमाणात होणार आहे व येथील परिसरातील

प्रदूषणाचे फोटो काढून स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयास तसेच माजी व आजी व्यवस्थापकीय संचालकांना दाखविण्यात आलेले आहेत. स्थानिकांना जो प्रदूषणाचा त्रास होत आहे, त्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्रकल्प व्यवस्थापनाकडून कोणतेच काम होत नाही. प्रत्येक वर्षी प्रदूषणाच्या त्रासाबाबत माझे दोन-दोन वैयक्तिक अर्ज सादर करण्यात आलेले आहेत व विस्ताकरणानंतर पाणी प्रदूषण, राख प्रदूषण किंवा मळी प्रदूषण असेल, त्याचा सर्वात जास्त धोका आम्हांला बसणार आहे, कारण वारा हा पूर्व-पश्चिम वाहत असतो तसेच पाण्याचा प्रवाह कुंभी नदीतून भोगावती नदीत जातो व प्रकल्पातील राख आमच्या पिण्याच्या पाण्यात, जेवणात व शेतात/रानात पडते, कारण गेले दोन वर्षे कारखाना व्यवस्थापनाने ईएसपी दुरुस्त केलेला नाही.

तरी माझी विनंती आहे की आपण त्रिसदस्यीय समिती नेमावी, परत अभ्यास/सर्वेक्षण करण्यात यावा व प्रदूषण नियंत्रण व्यवस्थेची शहानिशा करुन प्रदूषण नियंत्रण करण्यात आल्यानंतरच विस्तारिकरणाचा विचार करण्यात यावा असे येथील शेतकरी व नागरिक यांची इच्छा आहे असे मत मांडले.

**३) श्री एकनाथ पाटील, राहणार-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर:-**

यांनी सांगितले की, प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करताना चिमणीतून राख वातावरणात सोडली जाते, असा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे तसेच प्रकल्पातील चिमणीची उंची ही ८५.० मीटर आहे कारण चिमणीची उंची ही प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांपेक्षा जास्त उंचीची ठेवण्यात आलेली आहे त्यापूढे त्यांनी नमूद केले की, ईएसपी हेसुध्दा मशिन असून कधितरी बंद पडते त्यासाठी प्रस्तावित प्रकल्पातील ईएसपीस अतिरिक्त फिल्ड ठेवण्यात येईल त्यामुळे भविष्यात अडचण येणार नाही.

त्यांनी पुढे प्रतिपादन केले की राखेबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. पूर्वी प्रकल्पात पाच बॉयलर होते व त्यांची क्षमता १००.० टन प्रति तास होती. आता १००.० टनाचाच बॉयलर आहे परंतु पुर्वीच्या बॉयलरची बगॅस ज्वलन क्षमता व नविन बॉयलरची बगॅस ज्वलन क्षमता यात खूपच फरक आहे, कारण आता तंत्रज्ञान हे विकसित (Upgrade) झालेले आहे. त्यामुळे राखेचे उत्पादनसुध्दा कमी प्रमाणात होईल तसेच यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झालेले असुन त्यामुळे राख प्रकल्पाबाहेर जाऊच नये याची काळजी घेण्यात येईल.

सादरीकरणात सांगण्यात आलेले आहे की आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Online Continuous Monitoring System बंधनकारक आहे. त्याचा एक

संपर्क (connection) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व मुख्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे असतो. पारित केलेल्या मानकांपेक्षा (prescribed standards) जास्त उत्सर्जन झाल्यास त्वरित प्रकल्प प्रवर्तक,पर्यावरण सल्लागार यांना त्वरित त्याबाबत इशारा संदेश (Alert Message) पाठविण्यात येतो. तरी या सर्वांची कारखाना काळजी घेईल.

**४)श्री आनंदा दिनकर पाटील, राहणार-कोपार्डे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

याठिकाणी कुंभी-कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी होत आहे. यावर्षी सभासदांनी जो ऊसपुरवठा केला, प्रकल्पास जे बक्षिस मिळाले त्याबद्दल संचालक मंडळ व सर्व सभासदांचे अभिनंदन. तसेच प्रकल्प विस्तारिकरणास प्रकल्पाच्या कार्यकारी समितीकडून मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यापूढे त्यांनी सांगितले की, प्रकल्पात प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची साठवण क्षमता जी अस्तित्वात आहे, ती अपुरी वाटते कारण कोपार्डे गावात हे पाणी घेतले जाते परंतू कारखाना चालू असताना शेतकरी ते घेत नाहीत. त्यामुळे ते पाणी बाजूला नदीत मिसळण्याची शक्यता असते. तरी तळ्याची पाणीसाठवण क्षमता वाढवावी, जेणेकरुन पाण्याचे प्रदूषण होणार नाही.

तसेच पूर्वी विस्तारिकरण झालेले नव्हते व कंपनीच्या धुराड्यातुन राखेचे प्रमाण जास्त होते व त्याचा परिणाम हा कुडित्रे गावास होत असे, आता मात्र धुराड्याची उंची वाढविल्याने त्रास कमी झालेला आहे. त्यामुळे विस्तारिकरण झाल्यामुळे तोटा न होता फायदाच होत आहे. तसेच चार महिने ऊसगाळपासाठी लागत, तर आता लवकर गाळप होणार आहे व वाहतुकयंत्रणा येत नसल्याने ऊसतोडणी करण्याचे कामही शेतक-यांना आलेले आहे. प्रत्येक शेतक-याला आपल्या ऊसाचे लवकर गाळप व्हावे असे वाटते. त्यामुळे प्रस्तावित विस्तारिकरण हे शेतक-यांच्या, सभासदांच्यादृष्टीने फायद्याचे आहे. तरी हा विस्तारिकरण प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण व्हावा ही अपेक्षा करतो.

**५) श्री युवराज महादेव आडनाईक, राहणार-यवलूज, तालुका पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पामुळे राखेचा आणि सांडपाण्याचाही प्रश्न निर्माण होत आहे. ते सांडपाणी म्हणजे स्पेंट वॉश कुंभी व भोगावती नदीला जाऊन मिसळते त्यामुळे याचा यवलूज व सातार्डे गावातील शेतीला मोठ्या प्रमाणात फटका बसतो व विहीरी बाधित झालेल्या आहेत. त्यामुळे जसा हा प्रकल्प झाला, तेव्हापासून नदीकाठी भाताचे पीकच उगवलेले नाही व त्यामुळे याचा फटका शेतक-यांना बसत आहे.

तरी प्रकल्पाचे विस्तारिकरण करावे का, यावर माझे उत्तर असे आहे की, प्रकल्प विस्तारिकरणास विरोध नाही, मात्र सांडपाण्याची व्यवस्था ही प्रथम केलेली पाहिजे. जर धरण बांधताना विस्थापितांचा प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी विस्थापितांचे प्रथम पुनर्वसन करणे हा मुद्दा उपस्थित होतो. तसेच येथे प्रथम सांडपाण्याची प्रथम व्यवस्था करा, नंतरच विस्तारिकरण करण्यात यावे, एवढीच आमची मागणी आहे.

**६) श्री मच्छिंद्र सखाराम शेवगावकर, राहणार-कोपार्डे, तालुका-करवीर,जिल्हा-कोल्हापूरः-**

आज कुंभी-कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांनी जे विस्तारिकरण योजलेले आहे, तो निर्णय अतिशय चांगला आहे कारण आपल्या शेजारील कारखाने बाहेरून ऊस आणतात, त्यामुळे येथील शेतक-यांचा ऊस हा तसाच राहतो. त्यामुळे प्रकल्पाचे विस्तारिकरण गरजेचे आहे. तसेच या प्रकल्पाचे जरी विस्तारिकरण होणार आहे, तरीही या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात वाढ होणार नाही व येथील स्थानिक शेतक-यांच्या ऊस उत्पादनात वाढ होणार नाही. त्यामुळे साखर कारखाना व्यवस्थापन परिसरातील ऊस उत्पादन वाढीसाठी काही नविन तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे काय? याची माहिती द्यावी असे मत मांडले.

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तक यांनी ए.आय. (Artificial Intelligence) म्हणजे कृत्रिम बुद्दीमत्ता याचा वापर करुन परिसरातील ऊसशेती उत्पादनाचा विकास करण्याचा प्रयोग कारखान्यामार्फत नियोजित केलेला आहे. त्यासंदर्भात प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठक ही आयोजित केलेली होती व अशाप्रकारचे हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऊसशेती विकास टप्याटप्याने कारखाना क्षेत्रात राबविण्याचा कारखाना व्यवस्थापनाचा मानस आहे. त्यापुढे त्यांनी बैठकीत सांडपाणी म्हणजे मळीच्या व्यवस्थेविषयी प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावर आसवणी विस्तार प्रकल्प आहे त्यामध्ये प्रस्तावित इन्सिनरेशन बॉयलर (Incineration Boiler) कार्यान्वित करण्यात येणार आहे. ज्यामध्ये स्पेंट वॉश हे पूर्णपणे जाळून टाकले जाणार आहे.

त्यावेळी **श्री युवराज महादेव आडनाईक, राहणार-यवलूज,तालुका—पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर** यांनी आक्षेप नोंदविला की गेले वीस वर्षे प्रकल्प व्यवस्थापन हेच सांगत आलेले आहे. सांडपाण्यामुळे येथील शेती व विहिरी बाधित झालेल्या आहेत. तरी कारखाना व्यवस्थापनाने सांडपाणी प्रक्रियेचे नियोजन करावे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांच्याकडून हमी घेण्याची सूचना केली.

**७)श्री पुंडलिक रावजी पाटील, आमशी गाव, तालुका करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

याठिकाणी प्रकल्प विस्तारीकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा जो कार्यक्रम होत आहे व प्रस्तावित विस्तारिकरणाचे सादरीकरण दाखविण्यात आलेले आहे. तर या बैठकीत मुद्दा उपस्थित होतो तो म्हणजे सांडपाणी आणि या सांडपाण्यावर उपाययोजना कंपनीने केल्या पाहिजेत. माझे गाव कुशी आहे आणि आमच्या गावात २१०० एकर जमिन आहे परंतू पाण्याखाली फक्त ३०० एकर जमिन आहे व सदरील भाग हा संपूर्ण डोंगराळ भाग आहे. त्यासाठी मी कारखाना व्यवस्थापनास ३-४ महिन्यांपूर्वी पत्र दिलेले आहे की कारखान्याने जर सांडपाणी आम्हांला दिले तर आम्ही ४०० एकरवर ऊसाची शेती करु शकतो. तरी हे पाणी आम्हांला कारखान्याने द्यावे व त्याचप्रमाणे जे येथे जलप्रदूषण होत असेल, तर आम्ही सदरील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उपयोग करून प्रदूषण होऊ देणार नाही. सादरीकरणात सभासदांचा कसा फायदा होईल हे सांगितलेले आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला चांगला भाव मिळणार आहे त्यामुळे कारखान्याने एफआरपीपेक्षा जास्त भाव दिलेला आहे. तरी सांडपाणी नियोजन करताना मी उपस्थित केलेल्या मुद्द्याचा विचार करण्यात यावा व हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्याची माझी विनंती आहे.

**८) श्री कृष्णा मारूती पाटील, राहणार-कोपार्डे,तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्प बाधित प्रत्येक गावात माती परिक्षण करण्यात यावे व नंतरच अहवाल तयार करण्यात यावा. त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ च्या पारित निर्देशांनुसारच पर्यावरणाचे सर्वेक्षण करण्यात येते.

**९) श्री शरद दत्तात्रय नलवडे, राहणार-कुडित्रे,तालुका-करवीर,जिल्हा-कोल्हापूरः-**

आताच बैठकीत श्री पुंडलिक पाटील, आवशी गाव यांना त्यांच्या गावासाठी सांडपाण्याची मागणी केली. तर माझ्या वाटणीचे सर्वच पाणी त्यांना द्यावे ही मी आपणास विनंती करत आहे.

**१०)श्री विष्णु ज्ञानू राऊत, राहणार-कुडित्रे,तालुका-करवीर,जिल्हा-कोल्हापूरः-**

कारखान्यामधून निर्माण होणाऱ्या राखेमुळे व सांडपाण्यामुळे या परिसराचे अतोनात नुकसान होत आहे. तरी माझी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना आणि कंपनी व्यवस्थापकांना विनंती आहे की जेव्हा कारखाना सुरु असतो, त्यावेळी रहिवाशी म्हणून येथे राहण्यास यावे. तसेच जल, वायू, ध्वनी यांचे जे प्रदूषण होत आहे, याचा अभ्यास करण्यात यावा. तसेच ही जनसुनावणी कारखाना चालू

असताना घेणे आवश्यक होते. तसेच माझी विनंती आहे की ज्याज्या लांबच्या गावांना सांडपाण्याची गरज आहे, ते त्यांना त्वरित देण्यात यावे व या सांडपाण्याचे नियोजन करण्यात यावे.

**११) श्री धनाजी निवृत्ती पाटील, राहणार-आमशी, तालुका करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

मघाशी श्री पुंडलिक पाटील यांनी विषय मांडला की आमशी गावास पाणी देण्यात यावे. त्या गावाचा मी भूधारक आहे. श्री पाटील यांनी जो मुद्दा मांडला, त्यास आमचे समर्थन आहे. तरी ती योजना लवकरात लवकर अंमलात आणावी ही कारखाना प्रशासनास विनंती करत आहे.

त्यापूढे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी प्रकल्पाविषयी काही मुद्दा मांडण्याची सूचना केली.

त्यावर श्री धनाजी पाटील यांनी सांगितले की मी कारखान्याचे अध्यक्ष आमदार असतील व इतर वरिष्ठ अधिकारी यांना सांगतो की मी कारखान्याचा सभासद असून माझे आजेसासरे या कारखान्याचे प्रवर्तक आहेत. तरी कुस्ती खेळासाठी कारखान्यामार्फत सर्वतोपरी मदत करून त्यांच्या स्पर्धा भरवण्यात याव्या असे मत मांडले. त्यावेळी अध्यक्ष यांनी उपस्थितांना श्री धनाजी पाटील यांचा मुद्दा ऐकून घेण्याची सूचना केली की, श्री धनाजी पाटील सीएसआर निधीतंर्गत त्यांच्या आमशी गावात लोकोपयोगी कामे हाती घेण्याची सूचना करत आहेत. तसेच श्री धनाजी पाटील सांगितले की कारखान्यात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या खेळाडूंची निवड होते, त्यांना कारखान्याने मानधन चालू केले होते. ते बंद करण्यात आलेले आहे. तरी ती योजना परत चालू करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

यावेळी **प्रकल्प प्रवर्तक श्री एकनाथ पाटील, राहणार-कुडित्रे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूर यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की** पूर्वी आसवणी प्रकल्पात एक लिटर अल्कोहोल करण्यास नऊ लिटर पाणी लागायचे. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तक यांनी आसवणी प्रकल्पाचे आधुनिकीकरण केले त्यामुळे एक लिटर अल्कोहोलसाठी चार लिटर पाणी लागते. तसेच सादरीकरणात दर्शविल्यानुसार आसवणी प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल व प्रस्तावित प्रकल्प स्थापना व कार्यान्वित होण्यासाठी ३-४ वर्षे लागतील. त्यापुढे प्रकल्पात इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे व त्यामुळे प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही.

**१२) श्री कृष्णा ज्ञानू पाटील, राहणार-खुपीरे/शिंदेवाडी, ता. करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे त्यामुळे तरी ज्यांनी त्याबाबत शंका/सूचना केलेल्या आहेत, त्या जरूर सोडवून त्यांना न्याय द्यावा. त्यापुढे त्यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण का गरजेचे आहे याची उदाहरणे सांगत आहे असे म्हणून, सद्यस्थितीमध्ये कुंभी कासारी या ऊसपट्ट्यात कारखान्यास चांगला ऊस मिळणार आहे व कारखान्याची गाळप क्षमता कमी असल्याने लोकांना कारखान्यास ऊस गाळपासाठी देता येत नव्हता. त्यामुळे शेतक-यांनी ऊसतोडणी करुन दुसरे पीक घेता येत नव्हते. परंतू सदरील विस्तारिकरणामुळे शेतक-यांना त्यांचा सर्व ऊस देऊन दुसरे पीक घेता येणार आहे. तसेच येथील गाळप क्षमता कमी असल्याने येथील शेतक-यांना नाईलाजाने कमी दराने दुस-या कारखान्यांना ऊस द्यावा लागत आहे व त्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत आहे. तसेच विस्तारिकरणामुळे शेतक-यांचे उत्पन्न वाढेल कारण शेतक-यांना ऊसाचा दर देण्यात हा कारखाना एक नंबर आहे व गाळप क्षमता वाढल्याने शेतक-यांचे नुकसान टळेल. तसेच त्यांनी पुढे सांगितले की त्यांच्या गावात कंपनीने पाण्याची पाईपलाईन टाकलेली असून पाणीच येत नाही व फक्त पाईप पडलेले आहेत. तरी पाण्याची सोय करण्यात यावी असे मत मांडले.

**१३) श्री पांडुरंग कृष्णा तेलवेकर, राहणार-अडूर, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

कारखान्यासाठी सांडपाणी हे टाकाऊ आहे. मात्र आमशी आणि पारगाव वाड्यांसाठी ते पिकाऊ आहे म्हणजे उपयोगी आहे. तर पाणी देण्यासाठी केंद्राकडून अतिरिक्त निधी घेण्यात यावा.

**१४)प्राध्यापक बाजीराव पाटील, राहणार-कुडिले, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्पात बॉयलरने पाणी गरम केल्याने फॉग निर्माण होईल व तो एकसारखा राहतो तसेच बराच काळ तो नष्ट होत नाही. त्याचप्रमाणे त्यात गंधकाचे प्रमाण असते व त्या हवेचा प्रतिकूल परिणाम आसपासच्या रहिवाशांवर होणार आहे. त्यामुळे त्या फॉगबाबत काही उपाययोजना केलेली आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की महाराष्ट्रात अनेकठिकाणी इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित असून तशा प्रकारचा कुठलाही प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. तरी इन्सिनरेशन बॉयलर व त्यापासून होणारे उत्सर्जन याबाबत केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

**१५) श्री कृष्णा मारुती पाटील, राहणार-कोपार्डे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

येथे नुसती चर्चा करुन काहीही उपयोग नाही. लोकसुध्दा जायला लागली आहेत. तरी संचालक मंडळ व आपण चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**१६) श्री बळीराम ज्ञानू पाटील, राहणार-कोपार्डे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

मी गोपाळवाडीचा सभासद आहे व या प्रकल्पामुळे पाण्याचे, हवेचे प्रदूषण होणार आहे. याबाबत अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित सूचनांची नोंद घेतल्याचे सांगितले.

**१७) श्री दत्तात्रय शंकर पाटील, राहणार-साबळेवाडी, ता. करवीर जिल्हा-कोल्हापूरः-**

विस्तारिकरणास आमचा पूर्ण पाठिंबा आहे.

**१८) श्री बाबुराव सदाशिव केंबळेकर, राहणार-खुपिरे, तालुका करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्प उत्पादनात जी राख उडते, ती राख न उडण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

१९) **प्रकल्प प्रवर्तक - अध्यक्ष, कुंभी-कासारी सहकारी साखर कारखाना लिमिटेडः-**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती व बैठकीस उपस्थित असलेल्यांचे स्वागत. शेतक-यांच्या हितासाठीच कारखान्याने विस्तारिकरण नियोजित केलेले असल्यानेच संचालक मंडळाने विस्तारिकरणास मान्यता दिलेली आहे. केंद्र सरकारकडून विस्तारिकरण प्रकल्प ऊसगाळप क्षमता विस्तार ५,०००.० टन प्रतिदिनपासून १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत, सहवीज निर्मिती क्षमता विस्तार १९.५ मेगावॅटपासून ३०.० मेगावॅटपर्यंत आणि मळी/ऊसाचा रस/पाक यावर आधारित आसवणी प्रकल्प ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन पर्यत प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच आपला प्रकल्प हा जुना असल्याने आपणास विस्तारिकरणास परवानगी मिळालेली आहे. अन्यथा आता केंद्र सरकारकडून विस्तारिकरणास परवानगी मिळत नाही.

आजच्या बैठकीत सूचना करण्यात आल्या की प्रकल्पातील प्रक्रिया केलेले सांडपाण्याची काही गावातील लोकांनी मागणी केलेली आहे. आम्ही ते पुरवितो, शिवाय हंगाम संपल्यानंतरही प्रकल्पातील पाण्याचा पुरवठा त्या त्या सर्व गावांना दिला जातो. तसेच प्रस्तावित प्रकल्पात सर्व अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे व प्रकल्प व्यवस्थापन प्रदूषण नियंत्रणासाठी सर्व उपाययोजना राबविणार असून आता शासनाच्या निर्देशांनुसार सदरहू प्रकल्प हा झेडएलडी – म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल. तसेच प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे त्यासोबत प्रकल्पात इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार असून त्या स्पेंट वॉशची पूर्ण राख होणार आहे. तसेच सदरील राख व पोटॅश हे शेतीला खत म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रकल्पातील चिमणी ही ८० मीटरची आहे व त्यास ईएसपी बसविण्यात येणार आहे सदरील कामे ही टप्पाटप्याने करत असताना शासनाने पारित केलेले मानके आपण पाळणार आहोत. तसेच प्रकल्प सर्व निकष पाळणार आहे व प्रदूषण न होण्यासाठी अधिकाधिक उपाययोजना करण्यात येतील.

स्थानिक शेतक-यांचे ऊस उत्पादन कसे वाढविता येईल, त्यासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता (Artificial Intelligence) प्रणाली स्विकारण्यात येणार आहे. आम्ही त्यासाठी अर्ज मागितले आहेत व त्यासाठी २५०-३०० एकर क्षेत्रातील लोकांचे अर्ज आम्हांला प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे येथील शेतक-यांची आर्थिक प्रगती या प्रकल्पामुळे होणार आहे. तसेच कारखान्याने परिसरात विविध सामाजिक कामे केलेली असून ती परंपरा पुढे चालूच राहणार आहे. आपण एकत्रितपणे नव्या युगातील कारखाना उभारणी करणार आहोत व प्रकल्प आणि वसंतदादा शुगर इन्सिटट्यूट पर्यावरण व्यवस्थापन योजना राबविण्यास बांधिल आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**२०) श्री बाळासो सदाशिव पाटील, राहणार कोगे, तालुका-करवीर, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे मातीची प्रत कमी होत आहे त्यामुळे ऊसाचे उत्पादनही कमी होईल. तरी याबाबत काय उपाययोजना राबविण्यात येणार आहेत का? तसेच प्रकल्पातील कंपोस्ट खत हे सर्व सभासदांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचनांची नोंद घेतल्याचे सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले परंतु उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी समारोप करताना सांगितले की या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत अनेकांनी सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. सर्वांच्या सहकार्याने ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही अतिशय शांततेत पार पडलेली आहे. ज्यांना लेखी सूचना, आक्षेप नोंदवायचे आहेत, त्यांनी स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे ते सादर करण्यात यावे. सदरील बैठकीच्या इतिवृतासोबत ते शासनास सादर करण्यात येतील व सर्वांचे आभार मानून ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले. प्राप्त झालेले १७ सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(प्रमोद माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(निखिल घरत)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(संजय तेली)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा – कोल्हापूर